# प्रेसनोट

## कौमी एकता सप्ताहानिमीत्त वाद विवाद स्पर्धा

जा.क्र. ७७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२४/११/२०१६.

भंडारा :— आज दिनांक २४/११/२०१६ रोजी पोलीस बहुद्देशीय सभागृह, भंडारा येथे पोलीस विभागाच्या वतीने सोशल मिडीया राष्ट्रीय एकात्मता व कौमी एकतावर होणारे सकारात्मक व नकारात्मक बाबीवर मा. पोलीस अधीक्षक विनीता साहू मॅडम भंडारा यांच्या वतीने वादविवाद स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती.

यावेळी झालेल्या स्पर्धेमध्ये सेन्ट मेरी शाळा भंडारा, जकारदर कन्या विदयालय,संत शिवराम शाळा, नुतन कन्या शाळा, जिजामाता शाळा, रॉयल पब्लीक शाळा, लाल बहादुर शास्त्री शाळा, नगर परिषद उर्दु शाळा, जेसीस कॉन्वेट, मिशन हायस्कुल गणेशपुर, बंसीलाल लाहोटी नुतन महाराष्ट्र शाळा येथील शाळेंच्या मुला मुलींचा सहभाग होता, सोशल मिडीया राष्ट्रीय एकात्मता व कौमी एकतावर होणारे सकारात्मक व नकारात्मक यावर वादविवाद स्पर्धेत आपआपले मत व्यक्त केले त्यामध्ये सर्वाना पोलीस विभागाच्या वतीने मा. पोलीस अधीक्षक विनीता साहू मॅडम, तसेच अप्पर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर सर्व मुले व मुलींना प्रमाणपत्र व प्रथम पारीतोषीक अंशुल लाजेवार, व्दितीय पारीतोषीक सई आंबेकर, तृतीय पारीतोषीक तोषीता गभणे यांना देण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला परीक्षक मुकुंद ठवकर जि. प. हायस्कुल वरठी, माधव रामेकर प्रकाश हायस्कुल कारधा, मनीश मोहरे नानाजी विद्यालय शहापुर उपस्थित होते.

यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यावेळी कार्यक्रमाला मा.पोलीस अधीक्षक विनीता साहू मॅडम, अप्पर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जोगदंड भंडारा पोनी. कोलवाडकर पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे सुत्र संचालन पोउपनि. एस. बी. गोपाले यांनी केले. व आभार प्रर्दशन पोना. सावंत जाधव यांनी केले.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.